भूमि अभिलेख विभागामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या मोजणी प्रकरणांमध्ये हितसंबंधितांना मोजणी नोटीसा पोस्ट विभागाच्या ईपोस्ट अंतर्गत पाठविण्या-साठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्रमांक: पूरक-२०२६/प्र.क्र.३३९ (ई-१६७५७०७)/भूमापन

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : २७ जुलै २०२६

प्रस्तावना :-

भूमि अभिलेख विभागाडील मोजणी प्रकरणांमध्ये हद्द कायम, पोर्टाहस्सा, बिगरशेती, सामिलीकरण, न्यायालयीन वाटप, कोर्ट कमिशन, शासकीय व भूसंपादन इत्यादी प्रकारच्या मोजणी कार्यवाहीदरम्यान संबंधित सर्व्हे क्रमांक/गट क्रमांक/नगर भूमापन क्रमांक धारक, मोजणी अर्जदार, सहधारक, लगतधारक तसेच अधिकार अभिलेखात नमूद असलेल्या सर्व हितसंबंधितांना नियमानुसार मोजणी नोटीस बजाविणे आवश्यक असते. मोजणी प्रकरणांमध्ये हितसंबंधितांना ई-पोस्ट अंतर्गत स्पीड पोस्ट सेवेद्वारे मोजणी नोटीस पाठविणेकामी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भूमि अभिलेख विभागाकडील मोजणी प्रकरणांमध्ये ई-मोजणी प्रणालीमध्ये जनरेट झालेल्या नोटीस हितसंबंधितांना ई-पोस्ट अंतर्गत स्पीड पोस्ट सेवेद्वारे पाठविणेकामी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात माहे जुन/जुलै, २०२६ च्या अधिवेशनात "मागणी क्र. १ सी, २०२९ जमीन महसूल, १०३(००)(०२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांची आस्थापना (२०२९०४२२) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षांतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला निधीपैकी ५० टक्केच्या मर्यादेत रु.२,८०,००,०००/- (अक्षरी रू.दोन कोटी ऐंशी लक्ष मात्र) इतका निधी वितरीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी आहरीत करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,

पुणे यांनी सदर निधी मंजूरी दिलेल्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत निधी खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ शासनास सादर करावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ.सं.क्र.५६९/२०२६/व्यय-१०, दि.१८.०७.२०२६ अन्वये अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२७१७५०४०५७४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.27 17:51:27 +05'30'

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.निवडनस्ती (भूमापन).